**कालमर्यादा /महत्वाचे**

क्र. पोमसं/३-अ/१०/जीटी-१७/पोनिबिसं/०९/२०१७
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- २३/०१/२०१७.

संदर्भ :- दिनांक १६/०२/२०१५ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात शासनाने प्रसृत केलेला महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अध्यादेश, २०१५.

विषय :- सार्वत्रिक बदल्या-२०१७ करिता सुधारित माहिती पाठविण्याबाबत:- पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस उपनिरीक्षक / पोलीस निरीक्षक (अभियांत्रिकी / वाहतूक)/ (भांडारपाल/विजतंत्री), व मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षक/ पोलीस निरीक्षक ( तांत्रिक व नौका विभाग)

---०००---

**परिपत्रक:-**

पोलीस बिनतारी संदेश विभाग (अभि/वाह), व मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षक, व पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबत शासनाने संदर्भाधिन अध्यादेशानुसार खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे :-

१) दि.३१/०५/२०१७ पर्यत, किंवा त्यापुर्वी पोलीस बिनतारी संदेश विभाग (अभि./वाह.), व मोटार परिवहन विभागातील ज्या पोलीस उपनिरीक्षक, व पोलीस निरीक्षक यांचा प्रचलित नियमांनुसार (महाराष्ट्र पोलीस सुधारणा अध्यादेश-२०१५) एके ठिकाणी ०३ वर्षांचा सामान्य पदावधी पूर्ण झाला असेल, त्या पोलीस उपनिरीक्षक, व पोलीस निरीक्षकांची माहिती त्यांच्या बदलीच्या विनंतीसह या कार्यालयास पाठवावी, जेणेकरुन, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ च्या मान्यतेने त्यांच्या बदल्या करण्याबाबतची प्रशासकीय कार्यवाही करता येईल.

२) **सर्वसाधारण बदल्या - २०१७ ह्या खालील ०३ प्रकारात मोडतात.**

**अ) विहित कालावधी पूर्ण झालेले पोलीस अधिकारी**

**आ) विहीत कालवधी पूर्ण नाही, परंतु मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज, व**

**इ) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाचे पोलीस अधिकारी.**

३) तरी अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश यांनी पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस उपनिरीक्षक, व पोलीस निरीक्षक (अभियांत्रिकी /वाहतूक)/ (भांडारपाल/विजतंत्री), व विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग यांनी मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षक, व पोलीस निरीक्षक (तांत्रिक व नौका विभाग) यांची सध्याच्या पदांवर दि.३१/०५/२०१७ पर्यत तीन वर्षे कालावधी पूर्ण झालेला आहे, अशा सर्व संबंधीत पोलीस घटक कार्यालयांकडून माहिती प्राप्त करुन घेवून, त्यांची छाननी, तपासणी करुन सोबतच्या विवरणपत्रात भरुन वार्षिक सर्वसाधारण बदल्यांचे प्रस्ताव त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्राय/ शिफारशींसह पोलीस आस्थापना मंडळ -२ यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्याकरिता दोन प्रतीत या

कार्यालयास पाठवावेत. त्यामध्ये कोणत्याही अधिकाऱ्याची माहिती पाठवावयाचे नजर चुकीने राहून गेले तर त्यास संबंधीत घटक प्रमुख जबाबदार राहतील, याची कृपया नोंद घ्यावी.

**दि. ०१/०२/२०१७ पुर्वी या कार्यालयात पाठविलेले सर्व प्रकारचे विनंती अर्ज/ प्रतिकूल अहवाल इत्यादि या परिपत्रकान्वये रद्द समजण्यात येत आहेत. त्यावर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी, व ती बाब संबंधीत घटकप्रमुखांनी सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.**

४) पोलीस बिनतारी संदेश विभाग (अभि/वाह), व मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षकांची प्रतिकूल अहवालानुसार बदली करावयाची असल्यास संबंधीत घटकप्रमुखांनी या कार्यालयाच्या क्र. पोमसं/१४-अ/६७/एमएम/१८७/२०१६, दि. ०७/१०/२०१६ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या बाबींचे पालन करुन त्यानुसार संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबतचे परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठवावेत.

५) सर्वसाधारण बदल्या- २०१७ करिता खालीलप्रमाणे आराखडा निश्चित करण्यात आला आहे, त्याप्रमाणे खालील घटक कार्यालय प्रमुखांनी त्याचे अनुपालन करावे :

| कालावधी | करावयाची कार्यवाही |
|---|---|
| दिनांक ०१/०२/२०१७ ते २८/०२/२०१७ | पोलीस घटकांनी पोलीस अधिकाऱ्यांचे विनंती अर्ज प्राप्त करुन घ्यावेत. तसेच, विहीत कालावधी पूर्ण झालेल्या बदलीपात्र पोलीस अधिकाऱ्यांची माहिती तयार करावी |
| दिनांक ०१/०३/२०१७ | सर्व माहिती पो.म.सं. कार्यालयास पाठविणे. |
| दिनांक ०१/०३/२०१७ ते १५/०३/२०१७ | पोलीस महासंचालक कार्यालयात बदलीपात्र पोलीस अधिकाऱ्यांच्या विनंती अर्जांची तपासणी व कार्यवाही |
| दिनांक १६/०३/२०१७ ते २०/०३/२०१७ | पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ ची बैठक व आदेश |
| दिनांक २१/०३/२०१७ ते ३१/०३/२०१७ | बदली झालेल्या सर्व पोलीस अधिकाऱ्यांना रितसर कार्यभार हस्तांतर करुन त्यांना कार्यमुक्त करणे. |
| दिनांक ०१/०४/२०१७ ते ३०/०४/२०१७ | सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी कर्तव्यांवर हजर होणे, व संबंधीत घटकांनी या कार्यालयास अनुपालन अहवाल पाठविणे. |
| दिनांक ३१/०५/२०१७ | कर्तव्यावर हजर न झालेल्या अधिकाऱ्यांना ज्ञापन देवून हजर न झाल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यासंबंधी कळविणे.<br>दिनांक ३१/०५/२०१७ नतंर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, पो.म.सं. कार्यालय, महाराष्ट्र शासन यांचेकडून स्थिगिती आदेशंव्यतिरिक्त इतर सर्व अधिकाऱ्यांना स्थित कार्यमुक्त करुन दि. ०१/०६/२०१७ नंतर त्यांचे वेतन सध्याच्या घटकात काढण्यात येवू नये. |

**बदलीबाबत विनंती करण्यासाठी कोणीही पोलीस अधिकारी पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेण्यास येणार नाही. बदली झाल्यानतंर जोपर्यत बदलीच्या ठिकाणी तेहजर होत नाहीत, तोपर्यंत त्यांच्या कोणत्याही विनंतीचा विचार करण्यात येणार नाही. बदली झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी बदलीच्या ठिकाणी हजर होऊनच विनंतीसाठी नवीन घटकप्रमुखांच्या मार्फतीने, व त्यांच्या अभिप्रायांसह अर्ज सादर करावेत. नवीन घटकप्रमुखांच्या मार्फतीने सादर न केलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. बदली पुनर्विलोकनाबाबत नंतर कळविण्यात येईल.**

६) सदरची माहिती Word Sheet मध्ये **DVBW-TTSurekh (ISM V 6)** मध्येच मराठीत टंकलिखीत करुन, सदर माहिती Hard Copy सह सदर परिपत्रकासोबत जोडलेल्या सेवातपशिलाच्या नमुन्याप्रमाणेच योग्य रकान्यात योग्य माहिती नमूद करुन संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांच्या अद्यावत व बिनचूक सेवातपशिलांची विवरणपत्रे ही A4 Size पेपरवर " प्रत्येकी एक " या प्रमाणे पोलीस निरीक्षकांची माहिती desk3a.dgoffice@mahapolice.gov.in या ई-मेल वर तर पोलीस उपनिरीक्षकांची माहिती desk5abk@gmail.com या ई-मेल आय्.डी. वर पाठवावी. अन्य अक्षरात/ Font उपलब्ध नसल्याने व ती भरण्यासाठी अधिक कालावधी लागत असल्याने, अशी माहिती स्विकारणे शक्य होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

७) वरील माहिती ही गोपनीय स्वरुपातील असल्याने का.क्र.३-अ, व का.क्र.५-अ यांना लक्षवेध करुनच स्वतंत्र लखोट्यांमधून ती या कार्यालयास पाठवावी.

८) तरी अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, व विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग यांना कळविण्यात येते की, पोलीस उपनिरीक्षक, व पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्या-२०१७ बाबतची माहिती ह्या कार्यालयास सादर करताना, सदरची माहिती ह्या कार्यालयातील नोंदणी शाखेत न देता, ती थेट **पोलीस निरीक्षकांची माहिती कार्यासन क्र. ३-अ** मध्ये, **पोलीस उपनिरीक्षकांची माहिती कार्यासन क्र. ५-अ** मध्येच देण्याबाबत, तसेच सदरची माहिती संबंधीत कार्यासनात प्राप्त झाल्याबाबतची खात्रीदेखील करण्याबाबतच्या सूचना संबंधित लिपीक व टपाल ड्युटीवरील कर्मचाऱ्यांना द्याव्यात.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म.रा., पुणे

प्रत:-

कार्यासन अधिकारी, का.क्र.५-अ

## नमूना - विवरणपत्र

पोलीस उपनिरीक्षक (अभि./वाह.) (मो.प.) व पोलीस निरीक्षक (अभि./वाह.) (मो.प.) यांच्या सार्वत्रिक बदल्या-२०१७

| अ.क्र. | पोउपनि (अभि./वाह.) (मो.प.) / पोनि (अभि./वाह.) (मो.प.) यांचे नाव, सध्याची नेमणूक, मूळ जिल्हा, सेवानिवृत्ती दिनांक | सेवातपशील | विनंती अर्ज किंवा शिफारस असल्यास | घटक प्रमुखांचे अभिप्राय (अभिप्राय देतांना विनंतीमध्ये नमूद बाबी खऱ्या आहेत किंवा कसे, याबाबत अभिप्राय नमूद करावेत, फक्त शिफारस करु नये.) |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| | नाव :<br><br>सध्याची नेमणूक :<br><br>मूळ जिल्हा :<br><br>सेवानिवृत्तीचा दिनांक : | **पोउपनि (अभि./वाह.) (मो.प.)**<br>दि. ते कार्यालयाचे नाव | विनंतीची ठिकाण :-<br><br>मला पाहिजे असलेल्या बदली / नेमणुकीबाबत या अर्जाव्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्तीकडे संदर्भ / विनंती केली नाही. अशी विनंती अन्य कोणही मार्फत प्राप्त झाल्यास तिचा माझ्याशी संबंध नाही व त्याचा विचार करण्यात येवू नये. तसेच, विनंती केलेल्या जागी बदली मिळणे हा माझा अधिकार नसून प्रशासकीय सोयीनुसार व उपलब्ध रिक्त पदांची स्थिती विचारात घेवून माझ्या बदलीचा विचार केला जाईल ही बाब मला मान्य आहे.<br><br>(अर्जदाराची स्वाक्षरी) | (घटक प्रमुखांची स्वाक्षरी) |